*खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

*मराठी विभाग आयोजित*

## मराठी वाङ्मय मंडळ आयोजित कार्यक्रम अहवाल

## दि. २०.९.२०१६

---

दि. २०.९.२०१६ रोजी मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने मृत्यूजंय कादंबरीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त जेजुरी येथील शरदचंद्र पवार महाविद्यालयाचे प्रा. संतोष तांबे यांचे मृत्यूजंय कादंबरीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ एस.बी.पाटील , मराठी विभाग प्रमुख डॉ बी डी अनुसे, मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे , प्रा. किरण गाढवे व पदवी स्तरावरील मराठी विषयाचे अध्ययन करणारे विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी प्रा. संतोष तांबे म्हणाले की, महाभारतात कायम उपेक्षित राहिलेल्या कर्णाला शिवाजी सावंत लिखित मृत्यूजंय कादंबरीमुळे खऱ्या अर्थाने न्याय मिळाला. प्रा. संतोष तांबे पुढे म्हणाले की , नियतीच्या फेऱ्यामुळे कौरवांच्या अन्यायी बाजुने कर्णाला उभे राहावे लागले. त्यामुळे कर्णाचे सर्व दुर्मिळ श्रेष्ठ गुण झाकळले गेले. शिवाजी सावंत यांनी मृत्यूजंय मधून कर्णाला पुन्हा उभे करताना महाभारतातील प्रसंगांचे आणि व्यक्तिरेखांचे नव्या व्यापक मानवतावादी दृष्टीकोनातून पुनरुज्जीवन केले आहे. जीवन संघर्षात पिचण्यातसुध्दा शक्तीशाली जीवन सामावले आहे, हा कर्णाचा तेजस्वी संदेश ही कादंबरी आपल्याला देते असे ते म्हणाले.

मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे यांनी अवघ्या 23 व्या वर्षी शिवाजी सावंत यांनी मृत्यूजंय कादंबरी लिहिली असून ती वाचताना आपल्याला महाभारत जास्त चांगले समजते. गेल्या 50 वर्षांत प्रत्येक पिढीतील वाचकांना मृत्यूजंयने काही ना काही दिले असल्याचे सांगितले.
प्राचार्य डॉ एस.बी.पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांना मृत्यूजंय कादंबरी वाचण्याचे आवाहन केले.
कायर्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ संजय शिंदे यांनी तर आभार प्रा. किरण गाढवे यांनी मानले.

डॉ बी डी अनुसे
मराठी विभाग प्रमुख



व्याख्याते प्रा. संतोष तांबे यांचा सन्मान करताना
प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील




प्रा. संतोष तांबे
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



प्रा. संतोष तांबे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सोबत
प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील



लोकमत पुणे, बुधवार, दि. २१ सप्टेंबर २०१६ ७

# कर्णाला 'मृत्युंजय' कादंबरीमुळे खऱ्या अर्थाने न्याय

## संतोष तांबे : कादंबरीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त महाविद्यालयात व्याख्यान

राजगुरुनगर : महारथी, दानशूर, तेजस्वी आणि सर्वगुणसंपन्न असूनही महाभारतात कायम उपेक्षित राहिलेल्या कर्णाला शिवाजी सावंत लिखित मृत्युंजय कादंबरीमुळे खऱ्या अर्थाने न्याय मिळाला, असे प्रतिपादन जेजुरी येथील शरदचंद्र पवार महाविद्यालयाचे प्रा. संतोष तांबे यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने मृत्यूंजय कादंबरीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ एस.बी.पाटील, मराठी विभाग प्रमुख डॉ बी.डी. अनुसे, मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे, प्रा. किरण गाढवे व विद्यार्थी उपस्थित होते.

तांबे म्हणाले की, हा महारथी कर्ण हा गुण, कौशल्ये, सामर्थ्य आदींनी परिपूर्ण महामानव होता. पण नियतीच्या फेऱ्यामुळे कौरवांच्या अनीतीच्या बाजुने कर्णाला उभे राहावे लागले. त्यामुळे कर्णाचे सर्व दुर्मिळ व श्रेष्ठ गुण झाकोळले गेले.

शिवाजी सावंत यांनी मृत्यूंजय मधून कर्णाला पुन्हा उभे करताना महाभारतातील प्रसंगांचे आणि व्यक्तिरेखांचे नव्या व्यापक मानवतावादी दृष्टीकोनातून पुनरुज्जीवन केले आहे. जीवन संघर्षात उपेक्षित राहिलात तरी श्रेष्ठत्व लोप पावत नाही, हा कर्णाचा तेजस्वी संदेश ही कादंबरी आपल्याला देते.

वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी शिवाजी सावंत यांनी मृत्यूजंय कादंबरी लिहिली असून ती वाचताना आपल्याला महाभारत जास्त चांगले समजते. गेल्या ५० वर्षांत प्रत्येक पिढीतील वाचकांना मृत्यूंजयने काही ना काही दिले आहे, असे डॉ. संजय शिंदे यांनी सांगितले.

प्रत्येकाने साहित्य सौंदर्य, भाषेचा पोत आणि मानवी जीवनाचे कंगोरे समजून घेण्यासाठी मृत्युंजय वाचली पाहिजे, असे प्राचार्य डॉ एस.बी.पाटील यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ संजय शिंदे यांनी केले. प्रा. किरण गाढवे यांनी आभार मानले. (वार्ताहर)

'मृत्युंजय' कादंबरीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रा. संतोष तांबे. या वेळी व्यासपीठावर डॉ. एस. बी. पाटील, डॉ. बी. डी. अनुसे, डॉ. संजय शिंदे, प्रा. किरण गाढवे.

वृत्तपत्रातील प्रसिद्धी